# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

**परिपत्रक क्र.४३**

क्र.झोपुप्रा/सं.क्र. /२०००/उजि/२१२४
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दिनांक :- ६.७.२०००

विषय:- झोपडपट्टी पुनर्वसन योजना

-------------------

परि-२ योजनेत समावेश असलेल्या
झोपडीधारकांची यादी

विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) अनुसार प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर झाल्यावर विकासक / सहकारी संस्था यांनी तयार केलेले परिशिष्ट-२ ची तपासणी करून पात्रता यादी निर्गमित करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविले जाते व यथावकाश परि-२ सहकारी संस्था / विकासक यांना देण्यात येते. सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली काही परिशिष्ट-२ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, परिशिष्ट-२ च्या प्रमाणपत्रावर निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव व कार्यालयाचा शिक्का अथवा कार्यालयाचे सील लावलेले नसते. तसेच निर्गमित केल्याचा क्रमांक व दिनांक लिहिलेला नसतो. हया बाबी असणे अत्यंत आवश्यक आहे. यास्तव सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, परि-२ निर्गमित करताना त्याच्या प्रत्येक पृष्ठावर सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव / पदनाम व सिल चा शिक्का तसेच कार्यालयाचा शिक्का उठविण्यात आला आहे तसेच प्रमाणपत्रावर पत्र क्रमांक व दिनांक लिहिण्यात आला आहे. याची खात्री करण्यात यावी. या प्रमाणे तपशील परि-२ वर नसल्यास यापुढे अशी प्रमाणपत्रे योजनेसाठी स्विकारली जाणार नाहीत व ग्राहय धरली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

सही/

(विजय माथनकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी